**नि.फौ.ख.क्रं. २२/२०२०** **निशाणी क्र. २३**
**शासन .वि. अमित माणीककुळे**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०२ ची शपथेवर जबानी

.......

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | – | युवराज देवरावजी चांभारे |
| **वय** | – | ६३ वर्षे, धंदा – सेवानिवृत्त कारकुन, |
| **राहणार** | – | पिपरी मेघे, ता. व जि. वर्धा. |

.......

**सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता सी.ए.सयाम यांच्यामार्फत**

**१.** घटना दि.११/११/२०१९ ची आहे. त्यादिवशी मी तहसील कार्यालय सेलू येथे अव्वल कारकुन म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी माझ्या कडे कार्यालय आस्थापना होते, त्यामुळे मी माझे कार्यालयीन कार्यभारात प्रत्यक्ष सहभाग होता. माननीय तहसीलदार सेलू यांच्या आदेशानुसार घटनेच्या दिवशी शपथपत्र पडताळणीचे काम माझ्या कडे होते. त्यादिवशी अमित माणीककुळे हे एकुण ६ शपथपत्र घेवुन स्वाक्षरीकरिता माझ्या कडे आले. त्यावेळी मी सदरच्या शपथपत्रावर स्वाक्षरी करतांना माझ्या लक्षात आले की, त्या शपथपत्रावरील फोटो हे फोटोवरुन काढलेले आहे, तसेच त्यावरील स्वाक्षरी ही एकाच स्याहीमध्ये होती आणि ती एक सारखीच होती. त्यामुळे मी त्यांना त्या व्यक्ती कुठे आहे अशी विचारणा केली. त्यावेळी आरोपीने उडवाउडवीचे उत्तरे दिली. आरोपीने त्यावेळी मला एक किनकर पॉलिटेक्नीक येथे काम करत असल्याचे सांगितले. त्यामुळे मी किनकर पॉलिटेक्नीकल कॉलेज येथे फोन लावला. तेथुन मला कळाले की, आरोपी हा तेथे कोणत्याही प्रकारचे कामावर नाही. मी आरोपीला तेथेच थांबवुन ठेवले आणि तहसीलदार सेलू यांना त्याबाबत कळविले. तहसीलदार यांनी मला त्याबाबत अहवाल तयारकरुन मागितला. त्याप्रमाणे मी अहवाल दिला. त्यानंतर तहसीलदार यांनी नायब तहसीलदार शेंडे यांना या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. पोलीस माझ्या कडे पंचनाम्यासाठी आले त्यावेळी मी त्यांना सदरचे ६ शपथपत्र दिले व पोलीसांनी ते जप्त केले. सदरचा जप्ती पंचनामे माझ्या समक्ष करण्यात आला. आता मला

सदरचे दोन पंचनामे दाखविले, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास अनुक्रमे **<u>निशाणी क्र.२४ व २५</u>** देण्यात येते. मला सदचे शपथपत्र दाखविल्यास मी ते ओळखु शकतो. पोलीसांनी माझे बयान नोंदविले. मी आरोपीला आज रोजी ६ वर्षानंतर पाहत आहे, त्यामुळे तो तोच आहे की नाही असे मी ठामपणे सांगु शकत नाही.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ के.डब्लू.मगरे यांच्या मार्फत :</u>**

२. मी जो अहवाल तहसीलदार सेलू यांना दिला त्या अहवालाची प्रत तहसील कार्यालय सेलू येथे उपलब्ध आहे. मी प्रस्तुतच्या प्रकरणाबाबत कधीही पोलीस स्टेशनला गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुतच्या प्रकरणाबाबत पोलीसांना व्यक्तीशः कल्पना दिली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, कार्यालयीन पद्धतीनुसार कोणत्याही घटनेबाबत मला प्रथमतः माझ्या वरिष्ठयांना सांगावे लागते. घटनेच्या दिवशी माझ्या वरिष्ठयांनी पोलीसांना माहिती दिली की नाही याबाबत मला कल्पना नाही. डिसेंबरच्या पहिल्या हप्त्यामध्ये पोलीस आमच्या ऑफिसला आले त्यावेळी मी पोलीसांना सदरचे शपथपत्रे दिले. हे म्हणणे खरे आहे की, त्या दरम्यान सदरचे शपथपत्रे हे कार्यालयामध्ये माझ्या कार्यालयीन कस्टडीत होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी सदरचे शपथपत्रे माझ्या वरिष्ठयांना दिले नव्हते.

३. मी पोलीसांना बयान देतांना आरोपीला तेथेच थांबवुन ठेवले आणि तहसीलदार सेलू यांना त्याबाबत कळविले हे सांगितले होते, परंतु सदरचा मजकूर माझ्या जबाबात का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. सदरचे शपथपत्र हे माझ्या कडे कार्यालयीन कस्टडीत ठेवल्याबाबतचे कोणतेही कागदपत्र तयार करण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना सदरचे शपथपत्र दे पर्यंत ते केवळ माझ्याच कार्यालयीन कस्टडीत होते व ते कोणालाही उपलब्ध करुन दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कडे कोणतेच शपथपत्र आरोपीने सादर केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही शपथपत्र आरोपीकडुन हस्तगत केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही शपथपत्र पोलीसांना दिले नाही व पोलीसांनी कोणताही पंचनामा तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुद्ध

खोटा पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना खोटे बयान दिले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.01.17 16:50:06 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : १७/०१/२०२६